# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२
E-mail : dte.desk4@gmail.com web : http://www.dte.org.in

**परिपत्रक**

क्रमांक : ४/आस्था/परिपत्रक/२०१६/२५०
दिनांक : 17 JUN 2016

विषय :- दीर्घ सुटी विभागातील अध्यापक / कर्मचा-यांना हिवाळी / उन्हाळी सुट्टीबाबत

संदर्भ :- प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांना उद्देशून लिहिलेले संचालनालयाचे पत्र क्र.४/आस्था/२००१/८५५७, दि.०३.०७.२००१

या परिपत्रकान्वये उपरोक्त संदर्भाधीन संचालनालयाचे दि.०३.०७.२००१ चे पत्र रद्दबादल ठरविण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांमधील दीर्घ सुटी विभागात काम करणा-या अध्यापक / कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम क्र.५४ (१) (२) (ए) लागू होतो तसेच सदर नियमातील "मात्र कायम सेवेत नसलेल्या शासकीय कर्मचा-याला त्याच्या सेवेच्या १ ल्या वर्षाच्या संबंधात अशी कोणतीही रजा अनुज्ञेय असणार नाही" ही तरतूद लागू होते.

त्यामुळे या परिपत्रकान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थेतील दीर्घ सुटी विभागात काम करणा-या अध्यापकांच्या / कर्मचा-यांच्या दीर्घ सुट्ट्यांची गणना करण्यात यावी.

अ यापूर्वी संदर्भाधीन पत्रान्वये दीर्घ सुटीची गणना केली असल्यास त्यामधे दुरुस्ती करुन रजा लेखा अद्ययावत करण्यात यावा.

( डॉ.सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये.
२. सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
३. सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था
४. का.क्र.४ अ, मुख्य कार्यालय, मुंबई
५. निवड नस्ती

जाक्र. शाअसंमअ/आस्था/२०१६/1683 दि. 20 JUN 2016

प्रत - १) विभागप्रमुख - यंत्र/स्थापत्य/अणुविद्युत/संगणक/स्थापत्य/उपकरणीकरण/उपयोजित विज्ञान/कार्यशाळा/ग्रंथालय/कार्यालय - यांनी विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दाखवावे.



२) आस्था-१/आस्था-३/आस्था-४ - यांनी "अ" प्रमाणे कार्यवाही करावी.

३) श्री. डी. जे. परेरा - संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.

९७

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय